## अध्याय - २

## आस्थापनेची कामे व त्यांना नेमून दिलेली कार्य.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे चालविण्यात येणारे सिध्दार्थ सर्वसाधारण रुग्णालय हे सिध्दार्थ नगर गोरेगांव (प) येथे स्थित असून ते महापालिकेच्या पी/दक्षिण विभागाच्या अखत्यारित येते. सदर रुग्णालय महापालिकेतर्फे १९९८ पासून सुरु करण्यात आले.

सिध्दार्थ रुग्णालयाची रुग्णशय्या संख्या १७२ खाटांची असून सदर उपनगरीय रुग्णालयाद्वारे परिसरातील गरीब व गरजू रुग्णांना माध्यमिक आरोग्य सेवा पुरविण्यात येते. सदर रुग्णालय डॉ.आर.एन.कूपर रुग्णालय,जुहु रुग्णालयाशी संलग्नीत करण्यात आले आहे.

रुग्णालय प्रमुख म्हणून प्रमुख वैद्यकिय अधिकारी हे रुग्णालयाचा कार्यभार सांभाळतात.

- सिध्दार्थ रुग्णालयात खालील विभाग कार्यरत आहेत.
- अतिदक्षता विभाग ( २४ तास सेवा)
- अपघात विभाग ( २४ तास सेवा)
- अस्थिव्यंग (आंतर व बाहयरुग्ण ) विभाग
- वैद्यकिय (आंतर व बाहयरुग्ण ) विभाग
- बालरुग्ण (आंतर व बाहयरुग्ण) विभाग
- मानसिक चिकित्सा ( बाहयरुग्ण) विभाग
- स्त्रीरोग चिकित्सा (आंतर व बाहयरुग्ण) विभाग
- शल्यचिकित्सा (आंतर व बाहयरुग्ण) विभाग
- क्ष-किरण ( २४ तास सेवा) विभाग
- प्रयोगशाळा ( २४ तास सेवा) विभाग
- इसीजी विभाग
- रुग्णवाहिनी सेवा
- नाक,कान,घसा (आंतर व बाहयरुग्ण) विभाग
- नेत्ररोग (आंतर व बाहयरुग्ण) विभाग
- दंतचिकित्सा (बाहयरुग्ण) विभाग

- त्वचारोग ( बाहयरुग्ण) विभाग
- अस्थिव्यंग (आंतर व बाहयरुग्ण) विभाग
- सि.टी.स्कॅन ( २४ तास सेवा)
- डायलेसिस सेवा (पी.पी.पी.पी. अंतर्गत) सकाळी ७ ते संध्याकाळी ५ पर्यत.

रुग्णालयात खाजगी सेवभावी संस्था जीवनज्योत धर्मादाय संस्थेद्वारे डायलिसीस केंद्र चालविले जाते. प्रबोधन संस्थेमार्फत प्रबोधन रक्तपेढी व थॅलेसिमिया केंद्र चालविले जाते. मुबंई जिल्हा एड्स नियंत्रण सोसायटीमार्फत ए.आर.टी. केंद्र व समुपदेशन व चाचणी केंद्र चालविले जाते